# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


अधिसूचना

क्रमांक: 2अ/एडीएम/2013/ ४३९

दिनांक: 21 JUN 2013

विषय : शैक्षणिक वर्ष 2012-13 मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणा-या मागासवर्गीय उमेदवारांच्या जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी हमीपत्र सादर करून मुदतवाढ देण्याबाबत.....

शैक्षणिक वर्ष 2013-14 मध्ये शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण 2011/325 / तांशि-4, दिनांक 25.6.2012मधील सूचना विचारात घेऊन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रवेश फेरीमार्फत **प्रवेश ॲलॉट झाल्यानंतर प्रवेश निश्चित करतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले होते. आता** शासनाने शैक्षणिक वर्ष 2013-14 मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र तीन महिन्यात प्राप्त करण्याच्या अधीन राहून प्रवेश देणेबाबत परवानगी दिलेली आहे.

या पार्श्वभूमीवर सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणा-या ज्या मागासवर्गीय उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीचे वेळी उपलब्ध नसेल अशा विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र 3 महिन्यात सादर करण्याबाबतचे रुपये 100/-च्या स्टँपपेपरवर हमीपत्र केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश ॲलॉट झालेल्या संस्थेत सादर करावे. हमीपत्राचा नमुना (Proforma 'H') संचालनालयाच्या www.dte.org.in/fe2013 संकेतस्थळावर download विभागात उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(डॉ. सुभाष महाजन)

प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\Budage\2013-14\Gen Correspondence\validity submission extention.docx

Proforma- H

(रुपये 100/-च्या नॉन ज्युडीशियल स्टँम्पपेपरवर खाली नमूद केलेले हमीपत्र सादर करावे )

## हमीपत्र

मी .........................................( उमेदवाराचे नाव )असे हमीपत्र देते/देतो की, जर मला प्रथम वर्ष एमबीए/ एमएमएस/ पीजीडीबीएम/ पीजीडीएम/ एमसीए पदव्युत्तर पदवी /अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र /वास्तुशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी या प्रवेश प्रक्रियेत प्रवेश मिळाला तर जात पडताळणीबाबतची आवश्यक ती सर्व कागदपत्रे मी प्रवेश झालेल्या महाविद्यालयात दि. 30.08.2013 पर्यंत सादर करीन.

जात वैधता प्रमाणपत्र दिनांक 30/11/2013 पर्यंत मिळविण्याची सर्वस्वी जबाबदारी माझी असेल.

जात वैधता प्रमाणपत्र प्रवेश मिळालेल्या संस्थेत दिनांक 30/11/2013 पर्यंत सादर न केल्यास किंवा माझे जात वैधता प्रमाणपत्र कोणत्याही कारणास्तव मिळण्यास ऊशीर झाल्यास पर्यायाने प्रथम वर्ष एमबीए/ एमएमएस/ पीजीडीबीएम/ पीजीडीएम / एमसीए पदव्युत्तर पदवी /अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र /वास्तुशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमासाठी मिळालेला प्रवेश रद्दबातल झाल्यास त्याची जबाबदारी महाराष्ट्र शासन व तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहणार नाही व सदर जबाबदारी सर्वस्वी माझी राहील.

विद्यार्थ्याचे नांव :

विद्यार्थ्याची स्वाक्षरी व दिनांक :

जातीचा प्रवर्ग/ जातीचे नांव :

सीईटी रोल नंबर :